D:\pp\KANDALVAN\KANDALVAN Noting & Letter. (Autosaved).docx

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग**


हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/३२४/२०२० 2902 दिनांक:- १७/०१/२०२०.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक- 634
दिनांक- 25/08/2020.
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वन...

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**विषय:- कांदळवन वेबसाईटवर प्राप्त तक्रारीबाबत**
**T.O.I.Navi Mumbai reporton २०-९-२०१९**
**regarding mangroves destruction off**
**S.P.adjacent to Roadpali road.**
**( श्री.विनोद पुन्शी )**

अर्जदार श्री.विनोद पुन्शी यांनी मौजे रोडपाली, ता.पनवेल येथे कांदळवनाचा ऱ्हास झाल्याबाबतच्या तक्रारी अर्जाबाबत तहसिलदार पनवेल यांनी स्थळपाहणी करुन दि.२४/१२/२०१९ रोजी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे. उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी कळविलेनुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे.

कांदळवन तोडीबाबत प्राप्त तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने दि.३/१२/२०१९ रोजी स्थळपाहणी कामी श्री.एस.आर.रोडे, मंडळ अधिकारी कळंबोली, वन विभागाचे श्री.एस.ए.पाटील, वनपाल पनवेल, श्री.प्रमोद पाटील, नोडल ऑफीसर सिडको व श्री.अ.स.धवारे, क्षेत्रिय अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे उपस्थित होते. याकामी अर्जदार यांना ई-मेल संदेशाव्दारे कळविण्यांत आले होते. तसेच, भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधला असता त्यांनी स्थळपाहणी करणेकामी येण्यास नकार दिला असल्याचे तहसिलदार पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच, अर्जदार यांना देखील प्रत्यक्ष जागेची माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले व अर्जदार यांनी दिनांक २०/९/२०१९ रोजीच्या टाईम्स ऑफ इंडिया च्या वृत्तपत्रातील कात्रणावरुन सदरचा अर्ज केल्याचे सांगितले आहे. तथापी, सदर प्रकरणी तक्रारदार यांनी तहसिलदार पनवेल यांचे कार्यालयास ई.मेल संदेश करुन पत्र कमी कालावधीत मिळाले असे नमूद केले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. मॅग्रोव्हचा अक्षांश १९.०३५८९ व रेखांश ७३.०९०४०४ असा असून उपस्थितांनी स्थळपहाणी केली असता, रोडपाली येथील मॅग्रोव्हचा संपूर्ण परिसर यावर कोणत्याही प्रकारचे डेब्रिज अथवा तत्सम अन्य कोणत्याही वस्तु स्थळपाहणी वेळी आढळून आलेल्या नसल्याचे स्थळपहाणी अहवालावरुन दिसून येत आहे. तसेच, मागील ३ वर्षातील google images सोबत सादर करण्यात आल्या आहेत. तथापि, मौजे रोडपाली गावचा MRSAC नकाशा उपलब्ध नसल्याने सोबत सादर करता आला नाही. असे तहसिलदार पनवेल यांनी कळविले आहे. यास्तव, तक्रारदार यांचा अर्ज निकाली काढणेबाबत उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी या कार्यालयास विंनती केली आहे.

तरी, उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता, मौजे रोडपाली, ता.पनवेल येथील कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्यामुळे अर्जदार यांचा अर्ज निकाली ठेवण्यांत यावा असे वाटते.

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील दि.२१/१२/२०१९ रोजीचा चौकशी अहवाल, मंडळ अधिकारी कळंबोली यांचेकडील स्थळपाहणी अहवाल, मागील ३ वर्षातील google images च्या प्रती माहितीस्तव सोबत जोडल्या आहेत.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.

(विशाल दौंडकर)
**तहसिलदार (महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय रायगड**

Remo update the file, agenda
DCF(Mangroves)
17/8